महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण २०१७/३४०/प्र.क्र.९ /व्यय-११
वित्त विभाग, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०००३२
दिनांक : २२/२/२०१८.

संदर्भ:

१) शासन अधिसूचना,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही २००४/प्र.क्र.१५/१२,दिनांक २५.५.२००६
२) शासन अधिसूचना,सामान्य प्रशासन विभाग क्र.पीओडी १००७//प्र.क्र.९/१८(र.व का.),दि.१४.११.२०१३
३) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण२०१२/प्र.क्र.५४/१८ (र.व का.),दि.११.८.२०१४

कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ हा राज्यात लागू करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे या अधिनियमातील प्रकरण ३ करीता शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध नियम २०१३ तयार करण्यात आले असून ते दिनांक १४ नोव्हेंबर,२०१३ च्या अधिसूचनेव्दारे राज्यात लागू करण्यात आले आहेत.

त्यानुषंगाने कार्यासनाशी संबंधित विषयाच्या बाबतीत सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे निर्णय घेण्यासाठी सादरीकरणाचे स्तर निश्चित करण्यात येत आहेत. तथापि,वरिष्ठ अधिका-यांचे निदेश असल्यास किंवा काही विशिष्ट अपवादात्मक प्रकरणी आवश्यकता भासल्यास प्रकरणपरत्वे योग्य तो बदल करण्यात येईल. तसेच धोरणात्मक बाबींच्या प्रकरणात दि.११.८.२०१४ च्या परिपत्रकात नमूद केल्यानुसार सादरीकरणाचे तीनपेक्षा अधिक स्तर असतील.

सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२२१६५०१४४००५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Arvind Gautam Ghotekar

Digitally signed by Arvind Gautam Ghotekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6896bf872d5d253c5a0a0f7cdbef742ab9be14977dd9026 1caad7399c65687ac, serialNumber=24fd97d7d0f395f1f17ff6a805dfdb2ed16ed68ae7b6 114abfa22f7051cc979e, cn=Arvind Gautam Ghotekar
Date: 2018.02.22 16:51:07 +05'30'

(अ.गौ. घोटेकर)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
२) अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) यांचे स्वीय सहायक,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
३) प्रधान सचिव (व्यय)/प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), यांचे स्वीय सहायक,वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
४) उप सचिव (प्रशा-१/प्रशा-२) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
५) उप सचिव,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
६) अवर सचिव (प्रशा-२) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
७) निवडनस्ती

कार्यालयीन आदेश क्र. संकीर्ण २०१७/३४०/प्र.क्र.९ /व्यय-११,दि. २२.२.२०१८ सोबतचे विवरणपत्र

शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध नियम २०१३ मधील नियम ४ अंतर्गत कार्यासनाशी संबंधित बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रकरणे सादर करण्याबाबत अधिकारांचे तीन स्तर निर्धारित करणे

अ.क्र.	**कार्यासनाकडून हाताळले जाणारे कामकाज**	**सादरीकरणाचे ३ स्तर**			**अंतिम निर्णय घेण्यास सक्षम प्राधिकारी**
१	२	३	४	५	६
१.	व्यय विषयक अनौपचारिक संदर्भ	कक्ष अधिकारी/ अवर सचिव	उप सचिव	प्रधान सचिव (व्यय)	प्रधान सचिव (व्यय)
२.	पुरक मागणी / निधी वितरणाबाबतचे प्रस्ताव	कक्ष अधिकारी/ अवर सचिव/ उप सचिव	उप सचिव (अर्थसंकल्प)	प्रधान सचिव (व्यय)	अपर मुख्य सचिव (वित्त)
३.	मंत्रीमंडळ टिप्पण्या	कक्ष अधिकारी/ अवर सचिव	उप सचिव	प्रधान सचिव (व्यय)	अपर मुख्य सचिव (वित्त))
४.	लोकप्रतिनिधीकडून प्राप्त संदर्भ	कक्ष अधिकारी	अवर सचिव	उप सचिव	उप सचिव
५.	सर्वसाधारण संदर्भ	कक्ष अधिकारी	अवर सचिव	उप सचिव	उप सचिव